# विद्यापीठ अनुदान आयोग अंतर्गत,
# लघुशोध प्रकल्पाचा संक्षिप्त आराखडा
## *(Minor Research Project)*

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

## ‘‘ बिलोली तालुक्यातील बालकामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास’’

**२३-५६८/१२ (WRO) Pune**


**संशोधक**

**विठ्ठल शंकरराव फुलारी**

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

श्री.मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर,

जि.औरंगाबाद (महाराष्ट्र)


**जून - २०१५**

# ''बिलोली तालुक्यातील बालकामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास''

**प्रस्तावना (Introduction) : -**

भारत हा तिसऱ्या जगातील विकसनशील देश असून 21 व्या शतकातील "Elephant Economy" च्या वर्तमानस्थितीवर दृष्टीक्षेप टाकला तर **''सफरींग इंडियातील आम आदमी''** भांडवली शिक्षण, कुपोषणग्रस्त आरोग्य, भौतिक व सांस्कृतिक दारिद्र्य, काम करण्याची तयारी असताना देखील वाट्याला आलेली बेरोजगारी, वाढत चाललेली भाववाढ, फोफावत चाललेला भ्रष्टाचार आणि तुटपुंज्या व तोकड्या पायाभूत सुविधांच्या समस्येने अरिष्टग्रस्त आहे. यामुळेच देशातील आर्थिक व सामाजिक समस्या अतिउच्च शिखरावर जाऊन पोहचल्या आहेत आणि याच समस्यांच्या दृष्टचक्रातून निर्माण होणारे हिनफलित म्हणजे **'बालकामगार समस्या'** होय.

बालकामगार समस्या म्हणजे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला कुंठीत करणारी समस्या आहे. कारण, **''अमर्त्य सेन''** यांच्या मते, मानव हा विकासाचा प्रतिनिधी (Agent), लाभार्थी आणि निर्णयकर्ता (Adjudicator) आहे. त्यामुळे त्यांच्या विकासाशिवाय कोणताही विकास शक्य नाही. तर भारताचे तत्कालीन पंतप्रधान **''पंडित जवाहरलाल नेहरू''** यांच्या मते, राष्ट्राच्या विकासात कारखाने व यंत्रसामुग्री अगोदर मानवी घटकांचे अत्यंत महत्व आहे. यातही मानवी घटक महत्वाचा मानला तर प्रौढ मानवी घटकाच्या विचाराआधी प्रथम अत्यंत महत्वाच्या **''बालक घटकाचा विचार''** करणे अगत्याचे आहे. सहाजिकच देशाच्या आर्थिक विकासासाठी किंवा विकासाला चालना देण्यासाठी, देशातील मानवी घटकांचा किंवा त्याअगोदर उदयाच्या उज्ज्वल भविष्याचा (बालकांचा) विकास होणे अभिप्रेरित आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने कोणत्याही राष्ट्राला जलद, चिरंतन व सर्वसमावेशक विकास साधता येईल. अन्यथा, उलट परिस्थिती राहिल्यास त्या देशाचा सर्वांगीण विकास मागास राहणार, हे शास्त्रीय सैद्धांतिक सत्य आहे. बालकांचा विकास

देशाच्या विकासाशी जुडलेला आहे. हे सर्वश्रुत आहे. या संदर्भात भारताचे न्यायमूर्ती **''पी.एन. भगवती''** असे म्हणतात,

**"The Child**
**is a soual with a**
**being, a nature and**
**capacities of its own, who must be**
**helped to find them, to grow into their**
**maturity, into a fullness of physical and vital**
**energy and the almost breath, depth and**
**height of its emotional, intellectual and**
**spiritual being ; otherwise there**
**cannot be a healthy growth**
**of the nation"**

अर्थात,

**''बालक म्हणजे चैतन्यपूर्ण आत्मा,**
**स्वतःच्या क्षमता व नैसर्गिक प्रवृत्ती असलेला**
**त्या ओळखण्यासाठी त्यांचा विकास करण्यासाठी**
**फक्त त्याला सहाय्य करायला हवे**
**ज्यामुळे तो शारीरिकदृष्ट्या परिपक्व होईल आणि**
**आपली भावनिक, बौद्धिक व आध्यात्मिक विकासाची**
**सर्वोच्च पातळी गाठू शकेल**
**हे साध्य झाले नाही तर देशाचा विकास होणे शक्य नाही.''**

थोडक्यात, देशाच्या विकासासाठी गुणात्मकदृष्ट्या सक्षम बालकांची आवश्यकता आहे; परंतु भारतातील बालकांच्या अनेक समस्येकडे पाहता, सद्याचा विकास हा फक्त संख्यात्मक किंवा त्रोटक वाटतो. कारण, बालकांच्या अनेक समस्येंपैकी बालकामगार

समस्या अतिशय जलदगतीने भीषण रूप धारण करून भारतासमोर दत्त समस्या म्हणून उभी आहे.

भारतात बालमजूरी ही एक गुंतागुंतीची आर्थिक व सामाजिक समस्या आहे. तिची सांस्कृतिक आणि सामाजिक पाळेमुळेही खोलवर रूजलेली आहेत. जगात सर्वत्र आणि भारतात देखील लक्षावधी मुले बालमजुरीत गुंतल्याने त्यांच्या शिक्षणावर, विकासावर आणि भविष्यातील उदरनिर्वाहावर अयोग्य परिणाम होत आहे. बालकामगारांपैकी बहुतेकजण धोकादायक आणि शोचनीय परिस्थितीत काम करीत असल्याने त्याचे अपरिमीत शारीरिक व मानसिक नुकसान होत असते. बालमजूरी करणारे बालक, त्यांच्या शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, सहभाग या बालहक्कांपासूनही वंचित राहते. बालमजूरी ही केवळ कुटुंबालाच नव्हे तर अवघ्या देशालाही आर्थिक व सामाजिकदृष्ट्या नुकसानकारक आहे. कारण, बालकामगारामुळे ते कुटुंब दरिद्री आणि अकुशल कामाच्या विळख्यात अडकून पडते.

उपरोक्त सर्व परिस्थिती ही राष्ट्रीय, राज्य व प्रत्येक जिल्हा पातळीवर दिसून येते. यापासून नांदेड जिल्हयातील बिलोली तालुका लांब नाही विशेषत: मराठवाड्यातील सर्वात जास्त बालकामगार नांदेड जिल्ह्यात पहावयास मिळतात.[८] व नांदेड जिल्ह्यातील बालकामगारांची संख्या १,१४,२२८ इतकी आढळुन येते.[९] त्यामुळे बिलोली तालुक्यातील बालकामगारांचे परिणामकारक निर्मूलन हा सरकारच्या विकासाविषयक धोरणांचा आवश्यक भाग असणे गरजेचे आहे. तसेच बालकामगारांची मालकांच्या जाचातून मुक्तता होणे, बालकामगारांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणे, त्यांचे व आवश्यकतेप्रमाणे त्यांचे कुटुंबियांचे शक्योतपरी पुनर्वसन करणे, जनजागृती आणि सामाजिक अभिसरण करणे आवश्यक आहे; मात्र, अद्यापही शासनाला, प्रशासनाला, राज्यकर्त्यांना स्वयंसेवी संस्थांना नांदेड जिल्ह्यातील बालकामगार निर्मूलनाला यश प्राप्त झालेला नाही. त्यामुळे आजही बिलोली तालुक्यात बालकामगार आहेत. आणि या बालकामगारांवर आर्थिक व सामाजिकदृष्ट्या संशोधन होणे क्रमप्राप्त आहे.

**बालकामगारांची व्याख्या (Definition of Child Labour) :-**

"ज्या व्यक्तींनी आपल्या वयाची 14 वर्षे पूर्ण केलेली नाहीत अशा सर्व कामगारांना बालकामगार असे म्हणतात." ही व्याख्या प्रस्तुत संशोधनात बालकामगारांसाठी वापरली आहे.

**संशोधन विषयाचे समस्यासूत्रण (Formulation of Topic):-**

बालकामगारांची समस्या ही विश्वव्यापी समस्या आहे. विकसित देशापेक्षा विकसनशील देशामध्ये या समस्येने भीषण रुप धारण केले आहे. समाजातील बालकामगारांच्या समस्येचे गांभीर्य ओळखून या समस्येकडे सर्व जगाचे लक्ष वेधून घेऊन त्यांना ही समस्या सोडविण्यासाठी तसे कृतिप्रवण करण्यासाठी संयुक्त राष्ट्राने 1970 हे वर्ष आंतरराष्ट्रीय बालक वर्ष म्हणून साजरे करण्याचे जाहीर केले होते आणि त्यानुसार हे वर्ष साजरे झाले. त्यानंतरच खऱ्या अर्थाने काम करणाऱ्या मुलांकडे न्यायाधीश, संसद सदस्य, सामाजिक विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी, अर्थतज्ञ, प्रशासक आदिंचे लक्ष वेधले गेले. म्हणजे ही समस्या आता सार्वजनिक व्यासपीठ, चर्चा, परिसंवाद, परिषदा, कार्यशाळा या क्षेत्रापुरती मर्यादित न राहता त्या देशाचे कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायालयापर्यंत जाऊन पोहचली आहे. परंतु, दुर्दैवान घटनात्मक तरतूद, कायद्याचे अस्तित्व, शासनाच्या विविध योजना आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रयत्न असताना देखील आजही बालकामगारांची समस्या ज्वलंत व भीषण रूप धारण करून अस्तित्वात आहे. ती अजूनही सुटलेली नाही. त्यामुळेच ही समस्या जास्तच जटील होत चालली आहे. म्हणून या समस्येच्या निर्मुलनासाठी शासन व प्रशासनाची भूमिका अनुकूलरित्या प्रभावी असणे आवश्यक आहे. कारण, शासन व प्रशासनाच्या कार्यक्षमपणामुळेच बालकामगार समस्येचे निर्मूलन होऊ शकते.

सर्वसाधारणत: देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत भौतिक भांडवलाबरोबरच गुणात्मक मानवी भांडवलाची आवश्यकता आहे. या मानवी घटकात बालकांचाही समावेश होतो. त्यामुळे बालकांचा विकास होणे आवश्यक आहे. परंतु देशातील उद्याचे भविष्य हे

अंधकारमयरित्या बालकामगारावर होणाऱ्या परिणामामुळे देशातील सामाजिक, आर्थिक व भौतिक मूल्य विरहित होत आहे. त्यामुळे बालकामगारांवर अभ्यास होणे आवश्यक आहे. त्याकरिता बालकामगारांची सामाजिक व आर्थिक स्थिती कशी आहे? कामाच्या ठिकाणी बालकामगारांचे शोषण होते का? नेमके बालकामगार निर्मितीचे प्रमुख कारण काय? व यामुळे त्यांच्या जीवनावर काय परिणाम होतो? तसेच शासन, प्रशासन व न्यायालय, बालकामगार निर्मूलनासाठी कार्यदक्ष असूनदेखील बालकामगारांची निर्मिती का होते? या सर्व प्रश्नांतून उपस्थित होणाऱ्या समस्यांमुळे प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे.

**संशोधन विषयाचे सामाजिक योगदान व महत्व (Rational of Topic):-**

महाराष्ट्र राज्य हे औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले राज्य आहे. भारतात महाराष्ट्राचा मानवी विकासात चौथा क्रमांक लागतो. शिक्षणाच्या बाबतीतही महाराष्ट्राने चांगली प्रगती केली आहे. परंतु याच महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यात बालकामगारांची संख्या जास्तच फोफावली आहे. अलिकडील काळात बिलोली तालुक्याचे जलद विकासासाठी औद्योगिक विस्तार करण्यात येत आहेत आणि मुख्यत: बिलोली तालुक्यातील धार्मिक पर्यटनामुळे रोजगार निर्मिती व त्यामुळे बिलोली तालुक्यातील लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. उद्योगधंद्यामध्ये किंवा इतर क्षेत्रात रोजगार मिळावा म्हणून स्थलांतर करू इच्छिणाऱ्यांना चालना मिळाली. या जिल्ह्यात लोकांच्या सर्व प्रकारच्या गरजा भागविण्यासाठी असंघटीत क्षेत्रात अनेक लहान-लहान उद्योग निर्माण झाले. व्यापार उद्योग वाढला. घरकामाचाही व्याप वाढला. या सर्वांसाठी मनुष्यबळाची आवश्यकता भासली व त्यामुळे स्वस्तात उपलब्ध असलेले मनुष्यबळ म्हणून बालकामगार प्रथेला चालना मिळाली. स्थलांतर करून जी कुटुंबे शहरात आली ती प्रपंच चालवण्यास पुरेसा रोजगार न मिळाल्यामुळे आर्थिकदृष्ट्या अस्थिर झाली. वाढलेले दारिद्र्य कमी करण्यासाठी व संसार स्थिर करण्याच्या धडपडीत त्यांनी लहान कोवळ्या वयात आपल्या मुलांना विविध व्यवसायात कामाला जुपले. यातील काही मुले किरकोळ स्वरुपाच्या स्वयंरोजगाराकडे वळली आणि या सर्वांच्याच एकत्रित फलितामुळे बालकामगार निर्माण झाली. यामुळे

बिलोली तालुक्यातील बालकामगार समस्येने अतिशय भीषण रूप धारण केले व याच समस्येने कुटुंबाच्या समाजाच्या, राज्याच्या व पर्यायाने राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासात अडथळा निर्माण केला आहे. हा अडथळा दूर करण्यासाठी शासनाची, प्रशासनाची, स्वयंसेवी संस्थांची, राज्यकर्त्यांची समाजाची व संशोधनाची भूमिका महत्वपूर्ण असल्यामुळे प्रस्तुत विषयाचे महत्व अद्वितीय आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये (Objectives of the Research):-**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास खालील उद्दिष्टांच्या आधारे करण्यात आला आहे.

1) नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्याच्या आर्थिक व सामाजिक रचनांचा अभ्यास करणे.
२) बालकामगार विषयक विविध कायद्यांचा, आढावा घेणे.
3) बिलोली तालुक्यातील बालकामगारांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती अभ्यासून बालकामगारांच्या जीवन परिवेषाचा अभ्यास करणे.
4) बालकामगार निर्मितीच्या कारणांचा आणि परिणामांचा शोध घेणे.
5) बालकामगार समस्येवर प्रतिबंधात्मक उपाययोजना सूचविणे.

**संशोधनाची गृहीतके (Hypotheses of the Research):-**

1) मागासवर्गीय कुटूंबातील बालकामगारांचे प्रमाण अधिक असते.
2) अल्प उत्पन्न कुटूंबातील बालकामगारांचे प्रमाण जास्त असते.
3) बालमजुरांची मालक वर्गाकडून अनेक प्रकारची पिळवणूक होते.
4) बाल वयातील कामामुळे बालकामगारांच्या सर्वांगीण विकासावर प्रतिकुल परिणाम होतो.
5) बालकामगारांचे मालक वर्गाकडून आर्थिक, सामाजिक, शारीरिक व मानसिक वाइट परिणाम होतो.

**संशोधन आराखडा (Research Design):-**

बिलोली तालुक्यातील बालकामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास या विषयाच्या संशोधनासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन विषय (Topic of the Research):-**

" बिलोली तालुक्यातील बालकामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास"

**तथ्य संकलन (Data Collection):-**

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनाकरिता प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाचा वापर केला आहे.

**प्राथमिक स्त्रोत (Primary Data):-**

बालकामगारांच्या स्थितीचे अध्ययन करण्यासाठी अनुसूचीद्वारे माहिती संकलित केली असून यासाठी सर्वेक्षण व निरीक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**दुय्यम स्त्रोत (Secondary Data):-**

संशोधन विषयाचे अध्ययन करताना दुय्यम साधन सामुग्रीमध्ये विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, नियतकालिके, बालकामगारविषयक प्रकाशित शासकीय व प्रशासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, संशोधनासंबंधी लेख आणि अधिकृत संकेतस्थळांवरील उपलब्ध माहितीचा वापर केला आहे.

**सांख्यिकीय तंत्र (Statistical Tools of the Research):-**

उपलब्ध माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, वृद्धीदर, संयुक्त वृद्धीदर व आलेख इत्यादी सांख्यिकीय तंत्रांचा वापर करण्यात आला आहे.

**नमुना निवड (Sample Selection):-**

**नमुना क्षेत्र (Sample Area) :-**

नमुना निवड करताना प्रामुख्याने बिलोली तालुक्यातील शेती, उद्योग व हॉटेल क्षेत्रातील बालकामगार निवडले.

**निवड घटक (Sample of Factor):-**

बालकामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीच्या अभ्यासासाठी बिलोली तालुक्यातील ५१ बालकामगारांची निवड करण्यात आली आहे. तिन्ही क्षेत्रातुन प्रत्येकी १७ बालकामगार निवडले आहेत.

**नमुना निवड तंत्र (Techniques of the Sample Selection):-**

बिलोली तालुक्यातील बालकामगारांचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी निवडण्यात आलेल्या बालकामगारांची निवड **'सहेतुक नमुना निवड पध्दतीने' (Purpusive Sampling Method)** केली आहे.

**विषयाची व्याप्ती व मर्यादा (Scope & Limitations of the Study):-**

प्रस्तुत संशोधन हे बिलोली तालुक्यापुरते मर्यादित असून बिलोली तालुक्यातील फक्त उद्योग, शेती व हॉटेल व्यवसायाशी संबंधित बालकामगारांचा संशोधनासाठी अभ्यास केला आहे. तसेच सदरील विषयाची व्याप्ती बालकामगाराच्या आर्थिक व सामाजिक स्थितीच्या अभ्यासापर्यंत आहे.

**प्रकरणाची रुपरेषा (Chapter Scheme):-**

प्रस्तुत प्रबंधात प्रकरणाचे खालीलप्रकारे नियोजन केले आहे.

**प्रकरण पहिले : प्रस्तावना :-**

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, बालकामगारांच्या व्याख्या, बालकांच्या मानसिक, शारीरिक, बौद्धिक परिकल्पना, बालकामगारांचे स्वरूप, बालकामगारांचे क्षेत्रानुसार प्रकार, बालकामगारांचे प्रकार, बालकामगार समस्येची कारणे, बालकामगार समस्येचे परिणाम, बालकामगार संकल्पनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, बालकामगार कायदे, बालकामगारासंबंधी संविधान तरतुदी, बालकामगार निर्मूलन व पुनर्वसन राज्यकृती आराखडा, बालकामगारविषयक धोरण, 10 व्या पंचवार्षिक योजनेतील बालकामगार निर्मूलन व्यूहरचना, बालकामगार निर्मूलन योजनेवरील खर्च, बालकामगारांची जागतिक व्याप्ती, भारतातील बालकामगारांची व्याप्ती, महाराष्ट्रातील बालकामगारांची व्याप्ती,

मराठवाड्यातील बालकामगारांची व्याप्ती, नांदेड जिल्हयातील बालकामगारांची व्याप्ती, संशोधन विषयाचे समस्यासूत्रण, संशोधन विषयाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची गृहीतके, संशोधन आराखडा, संशोधन विषय, तथ्य संकलन, नमुना निवड तंत्र, संशोधन पध्दती, विषयाची व्याप्ती व मर्यादा, तसेच प्रकरणाची रूपरेषा इत्यादी घटकांचा अभ्यास केला आहे.

**प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा :-**

प्रस्तुत प्रकरणात संबंधित विषयाच्या अनुषंगाने प्रसिद्ध झालेले विविध लेख, संदर्भ ग्रंथ, संशोधन प्रकल्प, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, लघु प्रबंध, बालकामगार विषयाशी संबंधित शासकीय तसेच संस्थाद्वारा प्रकाशित संशोधन अहवाल, शासकीय प्रकाशित साहित्य, विशेषत: शासकीय स्तरावर नेमण्यात आलेल्या समित्यांचे अध्ययन अहवाल इत्यादींच्या अभ्यासाचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण तिसरे : बिलोली तालुक्याची पार्श्वभूमी :-**

प्रस्तुत प्रकरणात बिलोली तालुक्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, बिलोली तालुक्याची भौगोलिक पार्श्वभूमी, जिल्ह्याचे क्षेत्रवार उत्पन्न, लोकसंख्या, धर्मनिहाय आणि जातीनिहाय लोकसंख्या, लोकसंख्येची घनता, स्त्री-पुरुष गुणोत्तर, लोकसंख्येचा कामातील सहभाग, साक्षरता, शैक्षणिक स्थिती, दारिद्र्य, सार्वजनिक वितरण व्यवस्था, आरोग्यविषयक उपलब्ध सुविधा, मानव विकास निर्देशांक, प्रशासकीय रचना, कामगार व रोजगार, धार्मिक स्थळे व पर्यटन इत्यादी घटकांचा अभ्यास केला आहे.

**प्रकरण चौथे : बिलोली तालुक्यातील बालकामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्या :-**

प्रस्तुत प्रकरणात प्राथमिक माहितीच्या आधारे बिलोली तालुक्यातील बालकामगारांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा शोध घेऊन अनुसूचीद्वारे त्याची विस्तृत मांडणी केली आहे.

**प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी :-**

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाच्या उद्दिष्टानुसार निष्कर्ष काढलेले आहेत. तसेच संशोधनातून समोर आलेल्या बालकामगारविषयक समस्यांचा शोध घेतला असून त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महत्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत.

**निष्कर्ष (Conclusions):-**

1) प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासावरून संशोधकाने बालकामगार निर्मितीची अनेक कारणे शोधली आहेत. त्यामध्ये निरक्षरता, अज्ञान, प्राथमिक शिक्षणाची संथ गती, मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अनुपलब्धता, कुटुंबातील महाभयानक तीव्र दारिद्र्य, बेरोजगारी, खालावलेले जीवनमान, मागासलेले राहणीमान, वाढता प्रजनन दर, कुटुंबाचा मोठा आकार, पालकाचे अज्ञान, आर्थिक कमकुवतकतेमुळे स्थलांतर, अल्पवेतनावर उपलब्ध होणारे मुलाचे श्रम, कुटुंब निर्वाह भत्याच्या सोईंची उणीव, कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक मागासलेपण, परंपरा आणि समाजाचा व राष्ट्राचा मागासलेपणा ही बालकामगार निर्मितीची कारणे बिलोली तालुक्यातील बालकामगारांच्या अभ्यासातून पुढे आली आहेत. **(गृहीत क्रमांक चार या निष्कर्षावरून स्विकारले जाते.)**

2) अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या परिणामांचा शोध घेतला तर असे लक्षात येते की, कोवळ्या व लहान वयात मुलांना कष्टाची कामे करावी लागल्यामुळे त्यांना शारीरिक व्याधी होणे, शारीरिक वाढीत अडथळा निर्माण होणे, मध्यवर्ती मज्जासंस्थेस हानी पोहचणे, सामाजिक समायोजन नीट न होणे, आपली मते मांडण्यात असमर्थ ठरणे, व्यसनाधीनतेच्या आहारी जाणे, अश्लिल वातावरणात सामील होणे, जुगार खेळण्याच्या दिशेने जाणे. म्हणजेच बालकामगारांच्या सर्वांगीण विकासावर प्रतिकूल परिणाम होताना दिसून येतो. एवढेच नव्हे तर बालकामगारांचा परिणाम हा फक्त बालकामगारांवरच नव्हे तर समाजावर व पर्यायाने राष्ट्रावर प्रतिकूलदृष्ट्या होताना दिसून येत आहे. **(गृहीत क्रमांक चार या निष्कर्षावरून स्विकारले जाते.)**

3) प्रस्तुत संशोधनावरून असे दिसून येते की, बालकामगारांना कायदेशीर संरक्षण उपलब्ध आहे. परंतु अभ्यासासाठी निवडलेल्या सर्वच बालकामगारांना या तरतूदीची माहिती नसल्याचे आढळून आले आहे. बालकामगार प्रथेविरूध्द बैठका, सभा, परिषदा, मेळावे, आंदोलने इत्यादीद्वारे जनजागृती करणाऱ्या ज्या स्वयंसेवी संघटना, संस्था आहेत त्या प्रभावीपणे फारशा बालकामगारांपर्यंत जाऊन पोहचलेल्या दिसून येत नाहीत. विशेषत: शासन व प्रशासनदेखील बालकामगारांपर्यंत पर्याप्त प्रमाणात पोहचू शकले नाहीत. त्यामुळेच बालकामगार त्यांना उपलब्ध असलेल्या संरक्षण तरतूदीबद्दल अनभिज्ञ आहेत. **(गृहीत क्रमांक दोन या निष्कर्षावरून स्विकारले जाते.)**

4) प्रस्तुत संशोधनातून असा मुख्य निष्कर्ष समोर येतो की, अभ्यासासाठी निवडलेल्या सर्वच बालकामगार निम्न उप्तन्न गटात मोडतात. विशेषत: सरासरी ९० टक्के बालकामगारांचे सरासरी मासिक उत्पन्न ७०० रुपयापेक्षा कमी आहे म्हणूजे बालकगारांचे दररोजचे वेतन २३ रुपये आहे. सर्व बालकामगारांचे जास्तीत दररोजचे वेतन ३५ रुपयापेक्षा जास्त नसुन कमीत कमी २० रुपयापेक्षा कमी असल्याचे आढळुन येते.

5) धर्म व जात बालकामगांची नौकरी यांचा अन्योन्य संबंध असतो अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारात ४७.०५ टक्के हिंदु धर्मातील,३७.२५ टक्के मुस्लीम धर्मातील तर १५.६९ टक्के बालकामगार बौद्ध धर्मातील दिसून येतात.

6) प्रस्तुत संशोधावर असे निदर्शनास येते की, आजही ४३.१३ टक्के बालकामगार व त्याचे कुटूंब भाडयाने राहतात तर ५६.८६ टक्के कुटूंब स्वत:च्या घरात राहतात. परंतु ६६.६६ टक्के कुटूंब कच्च्या घरात व २९.४१ कुटूंब झोपडीत राहतात. फक्त ३.९२ टक्के कुटूंब पक्या घरात राहतात. अर्थात बालकामगार व त्यांच्या कुटूंबांचा राहनीमानाचा दर्जा खालावलेला दिसून येतो.

7) प्रस्तुत संशोधनात असे दिसून येते की, शासनाने बालकामगार निर्मुलनासाठी स्वातंत्र्योतर अनेक कायदयाची निर्माती करुन त्याची काही प्रमाणात अंमलबजाणी केली. ज्यामुळे बालकामगार निर्मुलनास काही प्रमाणात यश देखील प्राप्त झाले

आहे. परंतु अद्यापही बालकामगारांची संख्या ४.३५ दशलक्ष दिसून येते. म्हणजे बालकामगारांचे अस्तित्वच बालकमगार कायद्याची अपयशकारकता यश स्पष्ट करते. अर्थात बालकामगार कायदयाची प्रभावीपणे अंमलबजावणी बिलोली तालुक्यासह संपूर्ण जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर होतांना दिसून येत नाही.

8) प्रस्तुत संशोधनावरुन असे दिसून येते की, अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामागारांसाठी ६६.६६ टक्के बालकामगारांच्या मते त्यांना अतिशय कष्टप्रद काम करावे लागते. तर ३१.२७ टक्के बालकामगारांना कष्टप्रद काम वाटते. म्हणजेचे ९८ टक्के बालकामगारांना त्यांच्यातील क्षमतेपेक्षा/ कुवतीपेक्षा/ शारीरिक/ यष्टीपेक्षा जास्त काम करावे लागते. आणि विशेषत: ७२.५४ टक्के बालकामगारांना साप्ताहीक सुट्टी देखील मिळत नाही. म्हणजेच याबाबतीही बालकामगारांचे शोषण होते.

9) प्रस्तुत संशोधनावरुन असे दिसून येते की, बिलोली तालुक्याची लोकसंख्येत स्त्री-पुरुषनिहास समानता आहे. त्यामुळे बिलोली तालुक्यातील लिंग – गुणोत्तराची (९६५) (सर्वसाधारण वयोगट), (९०१,०-६) आदर्श स्थिती दिसून येत नाही.

10) प्रस्तुत संशोधनावरुन असे दिसून येते की, बिलोली तालुक्यात शैक्षणिक आरोग्य विषयक सार्वजनिक वितरण विषयक, दळणवळणविषयक, आर्थिक व सामाजिक पायाभूत सुविधा लोकसंख्येच्या तुलनेत तुटपुंज्या आहेत.  . **(गृहीत क्रमांक तीन या निष्कर्षावरून स्विकारले जाते.)**

11) सदरील अभ्यासावरुन असे लक्षात येते की, बिलोली तालुक्यातील प्रत्येक दुसरा व्यक्ती हा उरनिर्वाहसाठी अवलंबित्व असल्याचे दिसून येते. एकूण बिलोली तालुक्याची अर्थव्यवस्थाही आर्थिकदृष्टया कमकुवत होत आहे. . **(गृहीत क्रमांक एक या निष्कर्षावरून स्विकारले जाते.)**

**इतर निष्कर्ष**

1) प्रस्तुत संशोधनावरून असे लक्षात येते की, जागतिक पातळीवर सर्वात जास्त बालकामगारांचे प्रमाण सोमोलिआ या देशात असून ते प्रमाण तब्बल 49 टक्के आहे. अर्थात, सोमोलिआ राष्ट्रात 5 ते 14 वयोगटातील प्रत्येक दुसरा मुलगा बालकामगार आहे.

तसेच त्याखालोखाल पेरू (36 टक्के), घाना (34 टक्के), नेपाळ (34 टक्के), इथिओपिया (27 टक्के) या देशाचा क्रमांक लागतो. तर सर्वात कमी प्रमाण ब्राझील या राष्ट्रात आहे व ते प्रमाण फक्त 3 टक्के आहे. भारताचा विचार करता 5 ते 14 या वयोगटातील बालकामगारांचे प्रमाण 12 टक्के आहे. म्हणजेच भारतात प्रत्येक आठ मूलात एक बालकामगार पहावयास मिळतो.

2) राष्ट्रीय जनगणनेच्या अध्ययनानुसार सन 1971 ते 2011 या कालावधीत राष्ट्रीय स्तरावरील बालकामगारांची संख्या सन 2001 पर्यंत वाढत गेली. सन 2001 मध्ये भारतात 12.6 दशलक्ष बालकामगार होते. मात्र, सन 2011 च्या आकडेवारीनुसार भारतात 4.35 दशलक्ष बालकामगार आहेत. अर्थात, मागील दशकात मोठ्या प्रमाणात बालकामगारांच्या संख्येत घट झाली आहे. भारतात सर्वात जास्त बालकामगाराचे प्रमाण उत्तरप्रदेश, हरियाणा, आंध्र प्रदेश, राजस्थान, बिहार, मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र इत्यादी राज्यात दिसून येते. तर कमी प्रमाण केरळ, लक्षद्विप, पाँडेचरी, मणिपूर, मेघालय, छत्तीसगढ, अंदमान-निकोबार, अरूणांचल प्रदेश, दिल्ली, दादर नगर हवेली, नागालँड, सिक्कीम इत्यादी राज्यात आहे. कारण सदर राज्ये आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि साक्षरता प्रसार यामुळे या राज्यात बालकामगारांचे प्रमाण कमी आहे. अर्थात, भारतातील बालकामगारांचे प्रमाण सर्वच राज्यात कमी जास्त प्रमाणात दिसून येते. मात्र 5 दशकातील बालकामगारांची संख्या पाहता असे लक्षात येते की, बालकामगार कायदा परिणामकारकपणे राबविला जात नसल्याचा हा परिणाम असावा असा निष्कर्ष समोर येतो.

3) प्रस्तुत अभ्यासावरून असा निष्कर्ष समोर येतो की, महाराष्ट्रात सन 1971 च्या जनगणनेनुसार 938357 बालकामगार होते ती संख्या पुढच्या दहा वर्षामध्ये वाढून 1557756 इतकी झालेली दिसून येते. मात्र, 1981 नंतर बालकामगारांचे प्रमाण महाराष्ट्रात घटले आहे. सन 1991 व 2001 नुसार महाराष्ट्रात बालकामगारांची संख्या अनुक्रमे 1068427 व 764075 इतकी होती. सन 2009-10 साली राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या पाहणीनुसार महाराष्ट्रात फक्त 260673 बालकामगार असल्याचे प्रतिपादन संस्थेने केले आहे. अर्थात, मागील 4 दशकात महाराष्ट्रात बालकामगारांची संख्या घटली आहे.

परंतु सद्या अस्तित्वात असलेली बालकामगारांची संख्या देखील महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक क्षेत्राला अपायकारक आहे, असा अभ्यासाअंती अनुमान निघतो.

4) प्रस्तुत संशोधनातून असे दिसून येते की, औरंगाबाद विभागाच्या कामगार आयुक्त कार्यालयाने सन 2002 मध्ये मराठवाड्यातील बालकामगारांच्या अभ्यासासाठी सर्वेक्षण केले होते. त्यांच्या माहितीच्या आधारावर 14880 धोकादायक व बिगर धोकादायक स्वरूपाच्या आस्थापनामध्ये 26804 बालकामगार आढळून आले. त्यापैकी बिगर धोकादायक व्यवसायात 19426 बालकामगार दिसून आले. मात्र, 6878 बालकामगार अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये स्वत:चे आरोग्य धोक्यात टाकून धोकादायक ठिकाणी जोखीम घेऊन काम करताना आढळून आली. ही बाब मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टिकोनातून अतिशय चिंतनमय असल्याचे स्पष्ट होते.

5) प्रस्तुत संशोधनातून असे दिसून येते की, सन 2002 मध्ये कामगार आयुक्त कार्यालय यांनी केलेल्या बालकामगारांच्या सर्वेक्षणानुसार नांदेड जिल्ह्यातील 4183 धोकादायक आस्थापनामध्ये 1252 बालकामगार आढळून आले. परंतु सन 2011 च्या जनगणनेच्या अंदाजित आकडेवारीनुसार 114287 बालकामगार नांदेड जिल्ह्यात काम करताना दिसून आली. अर्थात, मराठवाड्यात सर्वात जास्त बालकामगार नांदेड जिल्ह्यात असून याच जिल्ह्यात इतक्या मोठ्या संख्येत बालकामगार असणे म्हणजेच नांदेड जिल्ह्याची आर्थिक व सामाजिक स्थिती किती महाविदारक आहे याचा अंदाज येतो.

**शिफारशी (Reccomendation):-**

1) दारिद्र्य हे मूलभूत कारण बालकामगार प्रथेच्या मुळाशी असल्याचे प्रस्तुत अभ्यासात नोंदविले गेले आहे. त्यामुळे दारिद्र्य निर्मुलन अत्यावाश्यक आहे. त्यासाठी शासनाने व प्रशासनाने दारिद्र्य निर्मूलनविषयक योजनांची प्रखर व काटेकोरपणे अंमलबजावणी नांदेडसहीत राज्य व राष्ट्रीय पातळीवर करावी.

2) बालकामगार प्रथा ही जटील अशी सामाजिक समस्या बनली आहे. या प्रथेची पाळेमुळे समाजात खोलवर रूजली आहेत. म्हणून ही प्रथा एकदम समूळ नष्ट करणे शक्य होणार नाही. प्रथम प्रतिबंधात्मक उपाययोजना करून या प्रथेला आळा घालावा

लागेल. याबरोबरच मूलभूत दीर्घकालीन उपाययोजनांचा अवलंब करून या प्रथेच्या निर्मूलनाचे उद्दिष्ट गाठावे लागेल. थोडक्यात, बालकामगार निर्माण होणार नाही अशी परिस्थिती निर्माण करण्यास प्राधान्य द्यावे लागेल. या सर्वांसाठी शासनाचे, प्रशासनाचे व राज्यकर्त्यांचे सर्वोतोपरी प्रयत्न अत्यावश्यक आहे.

3) बालकामगार प्रतिबंधात्मक कायद्याचे अस्तित्व असूनदेखील बालकामगार सर्वच क्षेत्रात दिसून येतात. अर्थात, बालकामगार कायद्याची पूर्णत: पायमल्ली होत आहे. त्यामुळे शासनाने व प्रशासनाने बालकामगार प्रतिबंधात्मक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी.

4) बालकामगाराचें आरोग्य चांगले राखण्यासाठी सामाजिक सुरक्षा कार्यक्रमांतर्गत बालकामगारांना आणि शक्य असल्यास त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय सेवा देण्यात यावी. यासाठी महानगर/नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांनी आरोग्य विभागामार्फत सेवा उपलब्ध करून द्यावी.

5) अभ्यासासाठी निवडलेल्या . ४३.१३ टक्के बालकामगारांना स्वत:चे घर नाही त्यामुळे शासनाने इंदिरा आवास व राजीव गांधी शहरी आवास योजनेअंतर्गत मोफत घरे बांधून द्यावी.

6) बालकामगारांमधील व्यसन मुक्तीसाठी त्यांचे प्रबोधन अत्यावश्यक आहे. यासाठी शासनाने व प्रशासनाने नाट्य, पथनाट्य, परिसंवाद, चर्चासत्र व सभाद्वासरे त्यांच्यात व्यसनमुक्ती जनजागृती करावी तसेच प्रत्येक गावाच्या ठिकाणी व्यसनमुक्ती केंद्र उभारावी.

7) कुटुंबाचे सामाजिक-आर्थिक स्थान उंचवण्यासाठी मुलांना शिक्षण देणे आवश्यक आहे. हे अशिक्षित व अज्ञानी पालकांनी लक्षात घेतले नाही किंवा बिकट परिस्थितीमुळे त्यांना मुलांना शिक्षण देणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासातली मुले-मुली मोठ्या प्रमाणात निरक्षर राहीली. परिणामी श्रमबाजारात त्यांची रवानगी अकुशल श्रमिक म्हणून झाली. अशा पालकांना जनजागरणाद्वारे शिक्षणाचे महत्व पटवून देऊन त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. यासाठी

प्रसारमाध्यमांचा प्रभावीपणे वापर करावा लागेल. प्रौढ शिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबवून अशिक्षित पालकांना शिक्षित करण्यावर भर द्यावा लागेल. यासाठी शासन, प्रशासन, राज्यकर्त्ये, स्वयंसेवी संस्था आदींनी प्रयत्न करावे.

8) बिलोली तालुक्यात ज्या-ज्या ठिकाणी बालकामगार श्रम करत आहे त्या त्या ठिकाणी पोलीस प्रशासनाने कारवाई करून त्या सर्व कामातून बालकामगारांची सोडवणूक करावी व संबंधित मालकावर न्यायालयीन कारवाई करावी.

9) बालकामगारांच्या शारीरिक, मानसिक आणि बौध्दिक निकोप वाढीसाठी आणि त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना कल्याणकारी सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या सेवा शासनाने व प्रशासनाने द्याव्या, यासाठी स्वयंसेवी संस्थांनी त्यांना मदत करावी.

10) बेरोजगारी हे देखील बालकामगार निर्मितीचे कारण आहे. त्यामुळे बेरोजगारी नष्ट होणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषत: बालकामगारांच्या कुटुंबातील प्रौढ व्यक्तीतील बेरोजगारी दूर करणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने विशेष रोजगारविषयक कार्यक्रमाची आखणी करावी व संबंधितांना रोजगार द्यावा.

11) बालकामगार निर्मूलनासाठी शासकीय योजनांचे अपयश मोठ्या प्रमाणात समोर आले आहे. त्यामुळे शासनाने नवीन बालकामगार धोरण आखून बालकामगार निर्मूलनाची दिशा ठरवावी. विशेषत: त्यामध्ये कृती प्रवण आराखडा आखावा.

12) बिलोली तालुक्यातील बालकामगारांचा अभ्यास करताना असे दिसून आले की, त्या जिल्ह्यातील बालकामगारांची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. शासनाला व प्रशासनाला बालकामगारांची निश्चित आकडेवारीच उपलब्ध होत नसेल तर त्याच्या संदर्भात स्थानिक पातळीवर विकासाधिष्ठित धोरण व योजना अखताच येऊ शकत नाही. त्यामुळे शासनाने दर पाच वर्षांनी बालकामगारांसंदर्भात जनगणना करावी व त्यांची त्या कामातून सोडवणूक करून त्यांचा सर्वांगीण विकास साधावा

13) बालकामगार ही समस्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मानवी विकासाशी संबंधित आहे. त्यामुळे मानव विकासातून बालकामगार निर्मूलन शक्य आहे. त्यामुळे राष्ट्रीय, राज्य व नांदेड जिल्ह्यासहीत बिलोली तालुक्यातील लोकांचा मानवी विकास बहुआयामी मानव विकास निर्देशांकाच्या त्रीसूत्रीवरून होणे आवश्यक आहे.

**संशोधक**

**विठ्ठल शंकरराव फुलारी**

सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
श्री.मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर,
जि.औरंगाबाद (महाराष्ट्र)